# राशिभविष्य - जानेवारी, २०२०.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==============================================================

**हे नूतन वर्ष आपणां सर्वांना सर्वांगीण आरोग्यसंपन्नतेचे, व्यावसायिक प्रगतीचे, उराशी बाळगलेली स्वप्ने साकार करणारे व सुखशांतीचे जावो, ही सदिच्छा !**

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम स्थानी हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह असल्यामुळे सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय लहरी, चंचल, अस्थिर झाला असण्याची शक्यता वाटते. तसे असेल तर कोणी चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या, तर ते सहन होत नसावे. या राशीची लहान मुले तर सध्या अतिशय हूड व खोडकर झाली असणे संभवते. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल व त्यामुळे हाती घेतलेल्या संशोधन कार्यात प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला शनि ग्रह अनुकुल असून त्याच्यामुळे काहींना नवे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल; तर काहींना नवी नोकरी मिळू शकेल. पण ह्या शनीमुळे भावण्डविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे शारीरिक उष्णता वाढून उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. विशेष करून मूळव्याधीसारखा आजार होणे संभवते. त्याशिवाय लहानमोठा अपघात झाल्यास हाडमोड होण्याचीही शक्यता आहे. जपा. तसेच हा मंगळ वीज, पाणी यांपासून धोकादायक असल्यामुळे जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहू नका. विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा . त्याचप्रमाणे या मंगळामुळे हाती घेतलेल्या कार्यात अडथळे येत असल्यामुळे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध नोकरीत प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. नोकरीत कामाचा ताण, मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे मानसिक ताणही वाढण्याची शक्यता आहे. जपा. घरी वडीलधाऱ्या मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. मोठ्या अधिकारी मंडळींच्या ओळखी होणे संभवते. त्यामुळे त्यापासूनही लाभ होणे शक्य आहे. हाती घेतलेल्या कामात यश मिळेल व त्यामुळे प्रतिष्ठा वाढेल. तसेच धनलाभ होणेही शक्य आहे. महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या स्वतंत्र व्यवसाय असणाऱ्या मंडळींना प्रतिकुल परिस्थितीला तोंड द्यावे लागेल; पण शुक्र ग्रह या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे प्रवासयोग येतील. नंतर महिन्याच्या उत्तरार्धात अखेरच्या सप्ताहात हा शनि रविसह दशम स्थानी असणार असल्यामुळे विलक्षण फलदायी होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला बुध ग्रह महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहापासून अनुकुल व लाभदायक होईल. तसेच गुरु ग्रह आध्यात्मिक प्रगतीस अनुकुल होईल. प्रवासाचे योग येतील. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. शिवाय कुमार्गी मित्रापासून नुकसान होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मनशांती लाभून मनशक्ती प्राप्त होईल. दररोज स्नान झाल्यावर २१ वेळा “ओम गं गणपतये नमः” मंत्राचा जप करा. तसेच “ श्रीगणेश अथर्वशीर्षा” चे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ घरीदारी सर्व ठिकाणी प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी या महिन्याचा संपूर्ण काळ मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून, सहनशील बनून व नम्रतेचे आचरण करून व्यतीत करावा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. एकूण सर्वच ग्रहस्थिती मनस्तापदायक असणार आहे. व्यय स्थानी असलेल्या हर्षलमुळे व धनस्थानी असलेल्या राहूमुळे सांपत्तिक अडचणी, आर्थिक चिंता निर्माण होतीलच; पण काही मंडळींना नको त्या प्रसंगाशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता आहे. काही मंडळींना अकारण शत्रुत्व निर्माण करणाऱ्या प्रसंगाशी मुकाबला करावा लागेल. जपा. त्याशिवाय कौटुंबिक जीवनात जीवनसाथीचे अनारोग्य, कौटुंबिक कलह अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे पतिपत्नीतील वाद, गैरसमज, दोघापैकी कोणाचे अनारोग्य अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. रवि ग्रह या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना प्रतिकुल असल्यामुळे नोकरीत इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील. हाती घेतलेल्या कामात अपयश येणे संभवते. त्यामुळे भावनेच्या भरात काहीजण भरकटत जाणे शक्य आहे. जपा. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणेही संभवते. विविध कारणांनी संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत मानहानी, भय, निराशा, मानसिक ताण, घरी वडील मंडळींचा विरोध अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल व त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात शनि ग्रह खूपच प्रतिकुल असल्यामुळे काही मंडळींना मोठ्या आजाराशी मुकाबला करावा लागेलसे दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो फारसा प्रतिकुल होणार नाही. उलट त्याच्यामुळे वरचेवर प्रवासाचे योग येतील. बुध -शुक्र महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व लाभदायक होतील; पण महिन्याच्या उत्तरार्धात बुधामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे संभवते. शुक्र व नेपच्यून ग्रह प्रतिकुल असल्याने स्वतंत्र व्यापार, व्यवसाय असणारांना प्रतिकुल होतील व त्यामुळे व्यवसायात अडचणी, अडथळे येऊन अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते. पण हा नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना लाभदायक होईल. गुरु ग्रह अनुकुल असल्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसाहक्काने असा धनलाभ होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना अनुकुल होईल व त्यामुळे मन:शांती लाभेल व मन:शक्ती प्राप्त होईल. दररोज स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषानी "ओम नमः शिवाय " मंत्राचा तर स्त्रियांनी " ओम शिवाय नमः" मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच " श्रीशिवलीलामृत " स्तोत्राचे पठण करावे.

**(३) मिथुन -** या राशीच्या सप्तम स्थानी म्हणजे केंद्रस्थानी रवि ग्रह असल्यामुळे नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. पण त्यासाठी स्वतः:चे शारीरिक आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो पूर्णपणे प्रतिकुल होणार असल्यामुळे नोकरीत सतत मनस्तापदायक घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे भावनेच्या भरात मनावरील ताबा सुटून कोठेही भरकटत राहाल. जपा. सप्तम स्थानी रविसह केतू, शनि, बुध व गुरु ग्रह आहेत. पैकी बुध ग्रह बराच काळ प्रतिकुल असेल व त्यामुळे काही दु:खकारक घटना घडण्याची शक्यता आहे. गुरु ग्रहामुळे काही मंडळींचे प्रेमसंबंध दृढ होतील, प्रवासयोग संभवतो, नवे स्नेहसंबंध जुळून येतील, अर्थलाभही होईल; पण शनीमुळे विवाहयोग येईलच याची खात्री देता येत नाही. येथील बुध -शनि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर बुध

ग्रह अनुकुल होईल; पण शनि ग्रह अनारोग्यकारक व अपेक्षाभंग करणारा असल्याचाच अनुभव येईल. पण शुक्र ग्रह अनुकुल असल्यामुळे काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षित अर्थलाभ होईल, तर ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना अचानक धनलाभ होईल; तर काहींना वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. शिवाय काहींना कीर्ती - प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला नेपच्यून अध्यात्मात रस असणारांना अनुकुल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील, तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे निश्चित असे काहीच घडणार नाही. उलट मित्रांशी भांडणे होऊन दुरावा वा शत्रुत्व निर्माण होणे संभवते. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या राहूमुळे सतत अपमानास्पद घटना घडतील. त्यामुळे तुमच्या मनात सूडबुद्धी जागृत होणे संभवते. तसेच काही मंडळींना वातविकाराचा एखादा आजार होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला मंगळ अनारोग्यकारक असून काही मंडळींना उष्णता विकाराचा आजार होणे संभवते. काही मंडळींना ताप येणे, काहींच्या अंगावर फोड येणे, काहींना दुखापत होणे तर काहींना अपप्रचाराचा मनस्ताप होणे संभवते. शिवाय अर्थहानी होईलच. काही मंडळींना रक्तविकाराचा आजार होणेही संभवते. ज्यांना हृदयविकार आहे त्यांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. शिवाय दररोज स्नान झाल्यावर २१ वेळा " ओम गं गणपतये नमः:" मंत्राचा जप करा. तसेच "श्रीगणपति अथर्वशीर्षा"चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या पंचम स्थानी असलेला मंगळ ग्रह संततिसुखात बाधा आणणारा असल्यामुळे या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. कोणाचे मनाविरुद्ध आचरण तर कोणाचे अनारोग्य शिवाय अन्य समस्या तापदायक होतील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हा मंगळ वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना या संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला रवि ग्रह दशम स्थानी असलेल्या नोकरी-व्यवसायाला पूरक असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी म्हणजे केंद्रस्थानी जात असल्यामुळे अनुकुलच होईल. विशेष करून उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तो नक्कीच प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. शनि ग्रहसुद्धा यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल; पण त्याच्यामुळे सहकाऱ्यात गैरसमजामुळे वाद, . भांडणे होऊन शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. तसेच विवाहेच्छूंना विवाहयोग येईलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला केतुही नोकरी-व्यवसायास अनुकुल होईल. तसेच या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या बुध - गुरु ग्रहांमुळे आरोग्य उत्तम राहील, कार्यसिद्धी होईल व धनलाभ होणेही संभवते. त्यामुळे सुखसमाधान लाभेल. पण येथील बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे प्राप्त झालेल्या सुखासमाधानात बाधा येणे संभवते. तसेच विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखातही काही कारणाने बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी शुक्र व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. शुक्रामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होऊ शकेल; तर काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होणे संभवते. पण येथील नेपच्यून जलभयकारक व

विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच खोल पाण्यात पोहू नका, व जलप्रवासही करू नका . शुद्ध पाणीच प्राशन करा. या राशीच्या दशम स्थानी असलेला हर्षल बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व लाभदायक असला तरी स्वतंत्र व्यवसाय असणारांनाही लाभदायक होईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या राहूमुळे आर्थिक लाभ होतील, काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल, हितशत्रूपासून रक्षण होईल; पण त्याच्यामुळे या राशीच्या मंडळींच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर कर्क ही गुरु ग्रहाची उच्च राशी असल्यामुळे श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच काही प्रमाणात अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात विविध कारणांनी मनस्थिती अस्वस्थ राहण्याची शक्यता आहे. प्रिय जनांपासून दूरत्व आल्यास अधिकच अस्वस्थ व्हाल. त्यात भर म्हणून संततिसमस्या चिंतित करील. अशा अस्वस्थ परिस्थितीत सावधानतेने आचरण न झाल्यास अपघातभय संभवते. नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. हृदयविकार असणारांनी मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच काळ व्यतीत करावा. पण त्यातल्यात्यात सुखाची बाब म्हणजे काही मनोनुकुल घटना घडतील, हितशत्रू पराभूत होतील व मनशांती लाभेल. वकिली, सल्लागारीसारखे चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना, गूढ अभ्यास करत असणारांना व विद्यार्थ्यांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. असे असले तरी शनि ग्रहामुळे काही मंडळींच्या अनारोग्यामुळे प्रगतीत अडथळे येणे संभवते. येथील शनि ग्रह महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर मनस्तापदायक व अनारोग्यकारक होणे संभवते. महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या षष्ठ स्थानी असणारा शुक्र ग्रह कलाकार मंडळींना अनुकुल असला तरी कलागुण असूनही कलागुण व्यक्त करण्यास संधी मिळणार नाही. नंतर तो या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर वैवाहिक जीवनातील सुखास अनुकुल असला तरी त्याच्यासोबत नेपच्यून असल्यामुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे, असमाधानकारक घटना, अन्य कटकटी अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला हर्षल गूढ व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल , प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील; तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळू शकेल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच ज्यांच्या हाती सत्ता आहे अशांपैकी काहींना अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होईल. जपा. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. काही मंडळी धनाच्या मोहापायी जुगाराच्या नादी लागून स्वतःचेच नुकसान करून घेतील. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगायत्री देवीची उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर १२ वेळा श्रीगायत्री मंत्राचा जप करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा बराचसा काळ अनारोग्य व मनस्ताप देणाऱ्या घटनांचा असह्य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. घरीदारी कोणाशी न पटणे, कुटुंबात असमाधानकारक घटना घडणे, गैरसमज, वाद, भांडणे होणे, अन्य कौटुंबिक त्रास सहन

करावे लागणे, प्रिय जनांपैकी कोणाचा दुरावा निर्माण झाल्यास विरहदु:ख सहन करावे लागणे, हाती घेतलेल्या कामात दिरंगाई होणे, अडचणी, अडथळे येणे, आर्थिक नुकसान होणे, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागणे अशापैकी घटना घडल्यास कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणारच. जपा. पण बुध -गुरु ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. गुरु ग्रहामुळे काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पूर्ण होतील. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -शनि -बुध या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर संततिसुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे उच्च गुणवत्ता असूनही कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळणार नाही. त्यामुळे या राशीची काही मंडळी व्यसनाधीन होणे संभवते. जपा. तसेच षष्ठ स्थानी शुक्रासह नेपच्यून असल्याने काही मंडळींना फसवणुकीचा त्रास होणे संभवते. काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना किंवा एखादी काल्पनिक चिंता त्रस्त करील. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे मन:शक्ती प्राप्त होईल, हिम्मत वाढेल, महत्त्वाकांक्षा वाढेल, धैर्य प्राप्त होईल, प्रवासयोग येईल; पण बेसावधपणे आचरण झाल्यास इजा होणेही संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी हर्षल हा विक्षिप्त ग्रह असल्याने कळत, नकळत छोटेमोठे अपघात होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या दशम स्थानी असलेला राहू अनुकुल असून या राशीच्या काही मंडळींना नोकरीत बढती, हाती सत्ता असणारे अधिकार पद प्राप्त होणे संभवते. काही मंडळींचा सन्मान होणेही शक्य आहे. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती या महिन्याच्या काळात अति भावनाशील होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काही घडले तर लगेच नैराश्य येणे संभवते. तसेच शारीरिक अनारोग्य होऊन उष्णताविकारांचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. डोळे, घसा, मान, दाढा यांपैकी कशाचा तरी आजार त्रस्त करील. शिवाय आर्थिक समस्याही अस्वस्थ करण्याची शक्यता दिसते. अचानक येणारी आर्थिक जबाबदारी पार पाडण्याची चिंता त्रस्त करील. येणे असलेले धन येण्यास विलंब होईल, पण देणे मात्र लगेच द्यावेच लागेल. त्याची चिंता अस्वस्थ करील. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच सर्व दृष्टींनी अनुकुल असल्याने नोकरीत जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. वरिष्ठ तुमच्या कार्यशक्तीवर प्रसन्न होतील. त्यामुळे काही मंडळींना बढती, पगारवाढ, कोणास मानाचे स्थान तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही शक्य दिसते. सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील व सुखसमाधान लाभेल. गुरु ग्रह अनुकुल असल्याने या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रसिद्ध होऊ शकेल. शनि ग्रहामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावण्डविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. त्यामुळे कौटुंबिक त्रास, नियोजित कार्यात होणारी दिरंगाई, अनावश्यक होणारा खर्च, गृहसौख्य हानी, अकारण निर्माण होणारे शत्रुत्व अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. जपा. पण या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. बुधामुळे मित्रसुख मिळेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शनि ग्रहामुळे गृहसौख्यात

बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेला शुक्र ग्रह सर्व प्रकारच्या कलांची आवड असणारांना अनुकुल होईल व त्यामुळे आवडत्या कलाक्षेत्रात अपेक्षित प्रगती करणे सहज शक्य होईल. शुक्रासह असलेला नेपच्यून आध्यात्मिक उपासना व गूढ संशोधन कार्यास अनुकुल होईल व त्यात प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, पतिपत्नीत होणारे वाद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापारव्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या राहूमुळे प्रवासयोग येतील. श्रद्धा असेल तर श्रीशिव शंकराची उपासना मन:शांती देईल. या राशीच्या पुरुषांनी स्नान झाल्यावर एक माळ ":ओम नम: शिवाय" मंत्राचा तर स्त्रियांनी "ओम शिवाय नमः" मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करावे.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींचा मूळ स्वभाव अत्यंत अहंकारी, तापट, हट्टी, मानापमान फार असणारा, हेकट, उद्धट अशा प्रकारचा असतो. त्यात सध्या राशिस्वामी मंगळ प्रथम स्थानी याच राशीत असल्यामुळे अशा स्वाभाविक दोषामुळे व काळ प्रतिकुल असल्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडल्यास अकारण श्रम, दगदग, चिडचिड होऊन शारीरिक मानसिक अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना तर महिन्याचा पूर्वार्ध खूपच मनस्तापदायक होणे संभवते. त्यामुळे नोकरीत कामात चुका, अडथळे, दिरंगाई होऊन असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. त्याशिवाय काही मंडळींना घरीदारी भांडणे, आर्थिक समस्या, अर्थहानी अशा समस्यांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते. जपा. अस्वस्थ मनस्थितीमुळे काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कुटुंबात शुभ व मनोनुकुल घटना घडतील, व दिलासा मिळेल. स्वतंत्र व्यवसाय करत असणारांच्या व्यवसायात प्रगती होईल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि - शनि -बुध हे ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर या राशीच्या नोकरदार मंडळींना अनुकुल होतील व अनेक मनोनुकुल घटना घडतील. वरिष्ठ अधिकारी तुमच्या कामगिरीवर प्रसन्न होतील. त्यामुळे काही मंडळींना बढती, पगारवाढ होणे संभवते. काही भाग्यवान मंडळींना एखादे मानाचे स्थान वा उच्च पदही मिळू शकेल. काही मंडळींना अपेक्षेनुसार नवी नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण शनि ग्रहामुळे भावण्डविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना पूरक होईल; पण या राशीच्या मंडळींनी सतत खोल विचार करत बसू नये. मेंदूला जरूर ती विश्रांती मिळणे आवश्यक आहे. नपेक्षा काही मंडळींना डोकेदुखीचा तर क्वचित कोणास मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे शेती उद्योग असणारांना त्यापासून आर्थिक लाभ होतील व सुखसमाधान लाभेल. पण शुक्राबरोबर असलेल्या नेपच्यूनमुळे घरगुती गोष्टींबाबत गैरसमज, घोटाळे निर्माण झाल्यास कौटुंबिक सुखात बाधा येईल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभयोग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. ज्यांना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य आहे अशांनी तो विचार मनातून काढून टाकावा. होत्याचे नव्हते होईल. जपा. तसेच या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व सात्विक सुखशांती

लाभेल. दररोज स्नान झाल्यावर " ओम गं गणपतये नमः:" मंत्राचा २१ वेळा जप करा व "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा. तसेच "श्रीहनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असल्याचे जाणवते. त्यामुळे वर्तमान शनि ग्रहाच्या साडेसातीच्या प्रतिकुल काळात सतत मनाविरुद्ध घडत असेल तर गहिरे नॅराश्य येत असले पाहिजे. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींना रवि -मंगळ -बुध -शनि - राहू हे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळींना नोकरी वा व्यवसाय काहीही असले तरी नोकरी-व्यवसायात सतत मनस्ताप देणाऱ्या घटनांना सामोरे जावे लागेल. म्हणून मनाचा निश्चय करून, सहनशील बनून व सतत नम्रतेचे आचरण करू शकलात तर होणारा मनस्ताप सुसह्य होईल, अनारोग्य फारसे होणार नाही व गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून ज्या काही मनोनुकुल घटना घडतील त्यांचे सुखसमाधान अनुभवू शकाल. रवि ग्रहामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील; व वित्तहानी होणेही संभवते. शिवाय घरीदारी वाद, भांडणे होणे संभवते. तसे झाल्यास शारीरिक अनारोग्य होणे संभवते. विशेष करून नेत्रविकाराचा आजार होणे संभवते. मंगळामुळे मानहानी होणे संभवते. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. शनि ग्रहामुळे नियोजित कार्यात अडथळे, अडचणी येणे संभवते. त्याशिवाय जीवनसाथी/संगिनीचे आजारपण, कुटुंबात घडणाऱ्या अनिष्ट घटना, प्रिय जणांपैकी कोणाचे होणारे दूरत्व, आर्थिक संकटे, अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. क्वचित कोणास कोर्ट -प्रकरणाशी मुकाबला करावा लागेलसे दिसते. त्यामुळे गहिरे नैराश्य येणे शक्य आहे; तर काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणेही संभवते. जपा. पण या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या गुरु ग्रहात व पंचम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहात शुभ योग घडत असल्यामुळे या राशीच्या बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना व कलाक्षेत्रातील मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल , प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळींना अंतर्ज्ञान प्राप्त होणेही शक्य आहे. या राशीच्या लेखकांनाही काळ अनुकुल व यशदायक होईल. शुक्र ग्रहही अनुकुल असल्याने कौटुंबिक सुख, धनलाभ, काही मंडळींना भूमिलाभ तर काही मंडळींना मान, प्रतिष्ठा असे काही प्राप्त होऊ शकेल. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यात स्वभाव लहरी झाल्यास हातून नुकसानकारक गोष्टी घडतील व अधिकच मनस्ताप होईल. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने सतत मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून आणि सहनशील बनून आचरण केल्यास होणारा मनस्ताप सुसह्य होईल, आरोग्य फारसे बिघडणार नाही व शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने ज्या काही मनोनुकुल घटना घडतील त्यांचे सुखसमाधान मिळवू शकाल. या काळात सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वकच करा. नोकरीव्यवसायात कर्तव्यपूर्तीत अडचणी, अडथळे, दिरंगाई, अपयश येणे व पीछेहाट होणे संभवते. त्यामुळे मानहानी व असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा.

कौटुंबिक जीवनात कोणा प्रिय व्यक्तींचे स्थलांतर झाल्यास असह्य होणारा दुरावा अस्वस्थ करील. शिवाय काही मंडळींच्या कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यताही जाणवते. त्यात भर म्हणून जीवनसाथी /संगिनीचे अनारोग्य निर्माण झाल्यास अस्वस्थ व्हाल व नैराश्य येणेही संभवते. मनस्थिती अस्वस्थ, चंचल झाल्यास नकळत अविचाराचे आचरण होईल. मित्रद्रोह होणे संभवते. तसेच काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणेही संभवते. या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात रस आहे त्यांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच ज्या मंडळींना सामाजिक कार्याची मनापासून आवड आहे अशांना यांच्या कार्यात प्रगती करणे शक्य होईल. शुक्र ग्रह अनुकुल असल्याने कौटुंबिक आणि वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल, तसेच अर्थलाभ होणेही संभवते. पण या राशीच्या धनस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे अन्य आर्थिक समस्या कशा पूर्ण करावयाच्या याची चिंता त्रस्त करील. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे घरीदारी कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी करत राहाल व आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे काही मंडळींचा स्वभाव धूर्त, कावेबाज होण्याची शक्यता आहे; त्यामुळे हितशत्रूंचा पराभव होण्याची शक्यता आहे. शिवाय हा राहू विषभयकारकही आहे. त्यामुळे शक्यतो बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करीलसे दिसते. पण या राशीच्या ज्या मंडळींचा अन्य जातिधर्माच्या मंडळींशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे अर्थलाभ होऊ शकेल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे काही कारणाने मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. शिवाय खूप कष्ट परिश्रम केल्यावरच अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. पण या मंगळामुळे या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिव शंकराची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषानी नियमितपणे “ओम नम:शिवाय” मंत्राचा एक माळ व स्त्रियांनी “ओम शिवाय नमः:” मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच दोघानीही दररोज नियमितपणे “ श्रीहनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करावे.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत कोमल झाली असल्याचे जाणवते. तसेच मानसिक संवेदनाही अति जलद होत असल्या पाहिजेत. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहिरे नैराश्य येत असावे, असे वाटते. पण निराश होऊ नका. कारण या महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर या राशीच्या व्ययस्थानी असलेला शुक्र प्राथम स्थानी येत आहे. त्यामुळे सुखसमाधानकारक मनोनुकुल घटना घडतील व मनस्थिती प्रसन्न होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. या महिन्याच्या पूर्वार्धात शनि -बुध अनुकुल असल्याने कोणताही चिकित्सक बौध्दिक नोकरी-व्यवसाय असणारांना महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल व लाभदायक होईल. पण शनीमुळे संततीपैकी कोणास कसला तरी असह्य त्रास झाल्यास चिंतित व्हाल. बुधामुळे धनलाभ व मित्रलाभ होणे संभवते. स्वराशीतील गुरु ग्रह लाभस्थानी असल्यामुळे या राशीचे विद्यार्थी शिक्षणात सहज अपेक्षित प्रगती करू शकतील. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. काही मंडळींना वाहनसुख मिळेल. या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेला केतूही अनुकुल असून त्याच्यामुळे प्रवासाचे योग येतील. शिवाय तो यशदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध-शनि प्रतिकुल होतील व सतत

मनस्तापदायक व अपमानकारक घटना घडणे संभवते. त्यामुळे अस्वस्थ व्हाल व त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळींना परदेशगमनाचे योग येणेही संभवते. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे काहीही कारणाने संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हा राहू दलाली-कमिशनवर व्यापार-व्यवसाय करत असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. पण या राशीच्या दशम स्थानी असलेला मंगळ स्वतंत्र व्यापारव्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडविण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता आहे. तसेच सतत कामात अडचणी अडथळे येणे संभवते. त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. शिवाय वरिष्ठांशी भांडण होणे संभवते. काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तो विचारही करू नये. आहे तो नोकरी- व्यवसायच मनापासून करावा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना करा. या राशीच्या स्त्री- पुरुषांनी स्नान झाल्यावर शिवशंकराचा जप करावा. या राशीच्या पुरुषांनी " ओम नमः: शिवाय" मंत्राचा तर स्त्रियांनी "ओम शिवाय नमः:" मंत्राचा एक माळ जप करावा व "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करावे.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अस्थिर, चंचल व विचित्र झाली असावी असे वाटते. तसे आले तर होणारे आचरणही अगदी विचित्र, अविचारी असे होत असले पाहिजे. अविचाराने फटकळपणे बोलून समोरच्या व्यक्तीचा अपमान होत असला पाहिजे. जपा. शिवाय अविचाराने नको तो खर्चही होत असला पाहिजे. शिवाय या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे कसली तरी चिंता त्रस्त करत असावी, असे वाटते. त्यामुळे मानसिक व्यग्रता येऊन गहिरे नैराश्य येणेही संभवते. पण हा नेपच्यून गुप्त पोलीस विभागात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. शिवाय नियोजित कार्यात अपयश येणेही संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. म्हणून शक्यतो प्रवास करू नका. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वावर खूष होतील. थोरामोठयांच्या ओळखी होतील. काही मंडळींना बढती, पगारवाढ असे काही मिळणे संभवते. तर काही मंडळींना मान, प्रतिष्ठा असे काहीतरी मिळणेही संभवते. क्वचित कोणा भाग्यवंतास एखादे उच्च पद मिळणेही शक्य आहे. या राशीच्या स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यावसायिक प्रगती करणे शक्य होईल. वकिली, सल्लागारी व्यवसाय, तसेच अन्य बॉद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळींना अपेक्षित असे आवडते कार्यक्षेत्र मिळणेही संभवते. बुधामुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान मिळेल. नवे मित्र मिळतील. केतुमुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा व आहे ती नोकरीच मनापासून करावी. पण शुक्र ग्रह पूर्णपणे अनुकुल असल्याने अपेक्षित सुखसमाधान लाभेल, ऐषारामाची साधने मिळतील, वाहनसुख मिळेल व चैनीत कालक्रमणा कराल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना

अनुकुल होईल  व मन:शक्ती प्राप्त होईल. दररोज स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====